## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## जल जीवन अभियानाचे निष्पादन लेखापरीक्षण

### लेखापरीक्षण थोडक्यात

| आम्ही हे लेखापरीक्षण का केले? | आपल्याला काय आढळले? |
|---|---|
| ➢ कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये यशस्वीरित्या साध्य झाली आहेत,<br>➢ योजनेच्या नियोजन, अंमलबजावणी आणि कार्यान्वयनोत्तर व्यवस्थापनासाठी कार्यक्षम संस्थात्मक रचना अस्तित्वात होती,<br>➢ आर्थिक संसाधनांचा वापर काटकसरीने आणि कार्यक्षमतेने करण्यात आला आहे; आणि<br>➢ कार्यक्रमाद्वारे निर्माण केलेली मालमत्ता पुढील दोन ते तीन दशकांसाठी शाश्वत आहे आणि त्यामुळे भावी पिढ्यांच्या जलसुरक्षेला कोणताही धोका पोहोचत नाही. | राज्यातील 1.46 कोटी ग्रामीण कुटुंबांना कार्यान्वित घरगुती नळ जोडणी (एफएचटीसी) देण्याचे उद्दिष्ट असताना, मार्च 2024 पर्यंत 1.25 कोटी कुटुंबांना एफएचटीसी देण्यात आली. 2019-24 या वर्षात महाराष्ट्रातील पाणी पुरवठा योजनांची (डब्ल्युएसएस) प्रगती केवळ 24.64 *टक्के* होती, कारण राज्यात एकूण 51,560 डब्ल्युएसएस सुरू करण्यात आल्या होत्या, त्यापैकी 12,703 पूर्ण झाल्या होत्या आणि 75.35 *टक्के* (38,857) डब्ल्युएसएस प्रगतीपथावर होत्या. राज्यात जेजेएमच्या अंमलबजावणीसाठी सुरुवातीचा अंदाजित खर्च (सप्टेंबर 2020) ₹ 13,668.50 कोटी होता. तथापि, प्रत्येक कुटुंबाला एफएचटीसी देण्याचे उद्दिष्ट साध्य न करताच मार्च 2024 पर्यंत ₹ 26,410.51 कोटी खर्च झाले होते.<br>पायाभुत सर्वेक्षण न केल्याने झालेल्या कमकुवत नियोजनामुळे जेजेएमच्या अंमलबजावणीवर परिणाम झाला. आवश्यक मापदंडांचा समावेश न करता तयार करण्यात आलेला ग्राम कृती आराखडा सदोष होता. संपूर्ण योजनेच्या कालावधीसाठी जिल्हा कृती आराखडा तयार करण्यात आला नव्हता आणि खात्रीशीर जलस्रोतांशिवाय योजनांचे नियोजन करण्यात आले होते. |

| आम्ही हे लेखापरीक्षण का केले? | आपल्याला काय आढळले? |
|---|---|
| | अपुरे प्रारंभिक नियोजन, सदोष सर्वेक्षणे, अंमलबजावणीतील विलंब आणि योजनांमध्ये वारंवार होणारे बदल यांमुळे अंमलबजावणीचा खर्च वाढला. अतिरिक्त रहिवाशांसाठी कामाची व्याप्ती वाढणे, जलस्रोत/जमिनीत बदल, अतिरिक्त कामांची अंमलबजावणी, निविदा दरापेक्षा जास्त दराने काम देणे या कारणांमुळे राज्य स्तरावर 27 *टक्के* (51,560 पैकी 13,835) आणि निवडक जिल्हा स्तरावर 38 *टक्के* (7,730 पैकी 2,976) डब्ल्युएसएस, या दर बदलाच्या प्रक्रियेत होत्या, ज्यामुळे खर्चात ₹ 9,608.87 कोटींची वाढ झाली.<br>उपयोगीता प्रमाणपत्रे आणि लेखापरीक्षित लेखे सादर करण्यास झालेल्या विलंबामुळे केंद्र आणि राज्य निधीचे वेळेत वितरण आणि वापर यावर प्रतिकूल परिणाम झाला.<br>राज्य स्तरावर, 26.50 *टक्के* (40,297 पैकी 10,677) गावांना 'हर घर जल' म्हणून प्रमाणित करण्यात आले, तर निवडक जिल्हा स्तरावर 27.30 *टक्के* (8,005 पैकी 2,185) गावांना 'हर घर जल' म्हणून प्रमाणित करण्यात आले.<br>पाणी गुणवत्ता तपासणीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा अपुऱ्या असल्याचे आढळून आले, कारण राज्य प्रयोगशाळा स्थापन झालेली नव्हती आणि उपविभागीय प्रयोगशाळांचे अधिमान्यता होणे बाकी होते.<br>संचालन आणि देखभाल धोरण तयार केले गेले नव्हते.<br>राज्यात, ₹ 2,043.79 कोटींच्या एकूण देय सामुदायिक योगदानापैकी, ₹ 21.72 कोटी |

| आम्ही हे लेखापरीक्षण का केले? | आपल्याला काय आढळले? |
|---|---|
| | (एक *टक्का*) रक्कम गोळा केली गेली (ऑक्टोबर 2024).<br>निवडक जिल्ह्यात आयएमआयएस मध्ये विसंगतीची प्रकरणे निदर्शनास आल्याने, जेजेएम-आयएमआयएस माहिती विश्वसनीय आणि अचूक नव्हती.<br>जिल्हा पाणी व स्वच्छता अभियानाच्या बैठका नियमितपणे आयोजित केल्या जात नव्हत्या. |
| प्रमुख आकडेवारी<br>**ऑगस्ट 2019 पर्यंत**<br>एकूण कुटुंबे: 138.54 लाख<br>एफएचटीसी व्याप्ती - 48.44 लाख<br>**मार्च 2024 पर्यंत**<br>एकूण कुटुंबे: 146.81 लाख<br><br>एफएचटीसी व्याप्ती: 125.01 लाख<br>पाणी पुरवठा योजना: (2019-24)<br>एकूण हाती घेतलेल्या पाणी पुरवठा योजना: 51,560<br>पूर्ण झालेल्या पाणी पुरवठा योजना: 12,703<br>हर घर जल असलेले तालुके: 351 पैकी 02 (0.56 टक्के)<br>हर घर जल प्रमाणपत्र असलेली गावे: 40,297 पैकी 10,677 (26.50 टक्के)<br>एकूण खर्च (2019-24): | ***आमची शिफारस काय आहे?***<br>***शासन पुढील गोष्टी करू शकते:***<br>➢ ***जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद केल्यानुसार, प्रभावी आणि कार्यक्षम ग्राम कृती आराखडा, जिल्हा कृती आराखडा आणि राज्य कृती आराखडयाद्वारे कामांचा स्पष्ट अंमलबजावणी पथनकाशा आणि संतुलित कार्यान्वयन प्रदान करावे.***<br>➢ ***पाण्याच्या खात्रीशीर स्रोतांची खात्री केल्यानंतरच डब्ल्युएसएस मंजूर केल्या जातील याची खात्री करावी.***<br>➢ ***जेजेएमअंतर्गत, खाजगी/स्वस्रोतावरून नळजोडणी असलेल्या सर्व घरांचे नियमित एफएचटीसीमध्ये रूपांतरण सुनिश्चित करणे.***<br>➢ ***केंद्र आणि राज्याच्या वाट्याचा निधी वेळेवर वितरित करण्यासाठी आणि त्याचा इष्टतम वापर सक्षम करण्यासाठी निधी वाटप नियोजन मजबूत करावे.***<br>➢ ***अखर्चीत रकमेवरील मिळणारे व्याज एकत्रित निधीमध्ये जमा करण्याची*** |

| **आम्ही हे लेखापरीक्षण का केले?** | **आपल्याला काय आढळले?** |
|---|---|
| ₹ 26,410.51 कोटी<br>अमान्य खर्च: ₹ 7.62 कोटी | ***आणि उपयोगिता प्रमाणपत्रे (युसी) व लेखापरीक्षित लेखे सादर करण्याची कालमर्यादा सुनिश्चित करावी.***<br>➢ ***अधिक चांगले अंतर्गत नियंत्रण आणि नियमित देखरेखीद्वारे अमान्य खर्च टाळण्यासाठी यंत्रणा तयार करावी.***<br>➢ ***प्रत्येक घराला एफएचटीसी प्रदान करण्याची प्रक्रिया जलद करणे, तसेच प्रलंबित डब्ल्युएसएस पूर्ण करून त्यांना पूर्णपणे कार्यान्वित करणे आणि डब्ल्युएसएस मंजूर करण्यापूर्वी व प्रदान करण्यापूर्वी जमिनीची उपलब्धता आणि अनिवार्य परवानग्या सुनिश्चित कराव्या.***<br>➢ ***अचूकता आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी देखरेख यंत्रणा बळकट करणे आणि एफएचटीसी माहितीची जुळवाजुळव करणे, तसेच, विशेषतः हर घर जल (एचजीजे) गावांचे प्रमाणीकरण, घरगुती जोडण्यांचे मीटरिंग आणि मालमत्ता संरक्षण या बाबतीत जेजेएम मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करावे.***<br>➢ ***राज्य प्रयोगशाळेची लवकर स्थापना करून जल चाचणी सुविधा बळकट करण्याबरोबरच, जल गुणवत्ता चाचणी आणि अहवाल देण्याची प्रक्रिया अधिक मजबूत करावी.***<br>➢ ***पाण्याच्या नमुन्यांच्या तपासणीची प्रक्रिया अधिक विश्वसनीय करण्यासाठी राज्यातील सर्व उपविभागीय प्रयोगशाळांना एनएबीएल मान्यता*** |

| आम्ही हे लेखापरीक्षण का केले? | आपल्याला काय आढळले? |
|---|---|
| | *आणि अधिस्वीकृती देण्याचा विचार करावा.*<br>➢ *ओ&एम धोरणाची लवकरात लवकर निर्मिती आणि अंमलबजावणी सुनिश्चित करावी आणि डब्ल्युएसएसच्या कार्यक्षम संचालन आणि देखभाल (ओ&एम) साठी सामुदायिक योगदान गोळा करण्याकरिता एक प्रभावी यंत्रणा तयार करावी.*<br>➢ *प्रभावी देखभालीसाठी कुशल मनुष्यबळ विकसित करण्याकरिता एक यंत्रणा तयार करावी.*<br>➢ *सर्व भूजल-आधारित योजनांसाठी अंतिम टप्प्यातील पाण्याची सुरक्षा आणि कृत्रिम पुनर्भरण प्रणाली सुनिश्चित करावी.*<br>➢ *जेजेएम-आयएमआयएस माहितीची सत्यता सुनिश्चित करावी.*<br>➢ *डब्ल्युएसएसचे प्रभावी सनियंत्रण सुनिश्चित करण्यासाठी, सरकारने जिल्हा जल व स्वच्छता अभियानाच्या नियमित बैठका घेण्याचा, ग्रामपंचायतीचा समावेश असलेला त्रिपक्षीय करार करण्याचा, तसेच सेन्सर्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), सानुकूलित डॅशबोर्ड, स्काडा प्रणाली आणि डीएमए यांसारख्या माहिती तंत्रज्ञान साधनांचा अवलंब करण्याचा विचार करावा.* |